

## राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित कार्यक्रम अहवाल
# सत्र २०२१-२२

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, मतदार जनजागृती,
माझी वसुंधरा, युवा स्वास्थ्य, रक्तदान, कोव्हिड १९ लसीकरण, इत्यादी




राष्ट्रीय सेवा योजना

Azadi Ka Amrit Mahotsav

राष्ट्रीय सेवा योजना

### संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित

### आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय,
### धामणगाव रेल्वे जि. अमरावती - ४४४७०९

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नाव | : | धामणगाव एज्युकेशन सोसायटी, हिंदी भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था, धामणगाव रेल्वे |
| **महाविद्यालयाचे नाव** | **:** | **आदर्श विज्ञान ज. भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे** |
| **सत्र** | **:** | **२०२१-२२ (कॉलेज कोड १०६)** |

## : नियमित कार्यक्रम अहवाल :

**अनुक्रमणिका**


| अनु. क्रं. | घटक (Particulars) | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | नियमित लेखे | सुरुवातीला |
| २. | उपयोगिता प्रमाणपत्र | सुरुवातीला |
| ३. | पावत्या व देयक खाते | सुरुवातीला |
| ४. | राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी यादी | ३ ते ८ |
| ५. | रा. से. यो. अहवाल | ९ पासून |
| ६. | आर्थिक मुल्यांकन व नियमित कार्यक्रम अंतर्गत राबवविलेले उपक्रम W – 2359, 2363 | -- |
| ७. | वृत्तपत्र कात्रण | -- |
| ८. | फोटो | -- |

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित

धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित

## आदर्श विज्ञान ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय,

## धामणगाव रेल्वे, जिल्हा अमरावती-४४४७०९

# राष्ट्रीय सेवा योजना २०२१-२२

# नियमित कार्यक्रम अहवाल (वार्षिक)

| कार्यक्रम अधिकारी | महिला कार्यक्रम अधिकारी | सहा. कार्यक्रम अधिकारी |
|---|---|---|
| प्रा. श्रीकांत पाटील | डॉ. पूनम गहुकर | डॉ. प्रवीण केचे |

मार्गदर्शक: डॉ. वाय. बी. गांडोळे, प्राचार्य, विशेष सहकार्य: डॉ. नरेंद्र नागपुरे, माजी रासेयो कार्यक्रम अधिकारी

***<u>संत गाडगे महाराज यांची दश सूत्री</u>***

*१. भुकेलेल्यांना = अन्न*

*२. तहानलेल्यांना = पाणी*

*३. उघड्यानागड्यांना = वस्त्र*

*४. गरीब मुलामुलींना = शिक्षणासाठी मदत*

*५. बेघरांना = आसरा*

*६. अंध, पंगू रोगी यांना = औषधोपचार*

*७. बेकारांना = रोजगार*

*८. पशु-पक्षी, मुक्या प्राण्यांना = अभय*

*९. गरीब तरुण-तरुणींचे = लग्न*

*१०. दुःखी व निराशांना = हिंमत*

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत आदर्श महाविद्यालय येथे रा.से.यो. पथकामध्ये २०२१-२२ या शैक्षणिक सत्रामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेत एकूण २०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. या शैक्षणिक सत्रामध्ये खालील प्रमाणे नाविन्यपूर्ण व नियमित उपक्रम किवा कार्यक्रम घेण्यात आले.**पर्यावरण संवर्धन, योग, वृक्षारोपण व वृक्ष-संवर्धन, हरित सेना, प्लास्टिक निर्मुलन, महाविद्यालय व ग्राम-स्वच्छता, आरोग्य, सेवा, सुरक्षा, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मुलन, एड्स जनजागृती, महिला सक्षमीकरण कोव्हिड १९ प्रतिबंधात्मक लसीकरण व जनजागृती मोहीम, जल पुनर्भरण,** इत्यादी उद्देश घेवून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ योगेंद्र गांडोळे यांच्या मार्गदर्शनात व **प्रा. श्रीकांत पाटील, कार्यक्रम अधिकारी यांच्या संकल्पना व नेतृत्वात, प्रा.डॉ. प्रवीण केचे, सहायक कार्यक्रम अधिकारी आणि डॉ.सौ.पूनम गहुकर, महिला सहायक कार्यक्रम अधिकारी यांच्या संयोजनाखाली**, विशाल मोकाशे, आदर्श बरवट, रोषण वरठी, कपिल निहिटे, रेवती गीधाने, कु.पायल गुप्ता, युगा धोपटे, तेजस भागवत, कु. चंचल खोत, चंचल पंचबुद्धे, रीना कुमरे, पूनम कुऱ्हाडकर, ऋषभ ठाकरे, प्रज्वल आरेकर, साक्षी गोडबोले, संस्कृती मांडले, सुवर्ण वंजारी वैष्णवी चौधरी, साक्षी माळोदे, भैरवी गांडोळे, यांच्या सहकार्याने व २०० स्वयंसेवकाच्या मोठ्या मेहनतीने व उत्साहात पार पडले.

## महाविद्यालय व रा. से. यो. चमू बद्दल माहिती

वर्ष १९६१ मध्ये धामणगाव एज्युकेशन सोसायटी च्या पुढाकाराने आदर्श महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. १९१४ पासून शिक्षणाच्या गरजा भागवणारी विदर्भातील सर्वात जुनी धामणगाव एज्युकेशन संस्था. अंजनसिंगी रोडवरील स्वत:च्या प्रशस्त कॅम्पसमध्ये वसवलेले हे महाविद्यालय आहे. हे महाविद्यालय संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित आहे. या महाविद्यालयामध्ये आधुनिक, सुसज्ज प्रयोग शाळा असून, प्रशासकीय विभाग संगणकीकृत आहे.



१९६१ मध्ये कला आणि वाणिज्य शाखेतून हे महाविद्यालय सुरू झाले. तथापि, नंतर १९७२ मध्ये विज्ञान विद्याशाखा जोडण्यात आल्या. सध्या, हे महाविद्यालय बी. ए., बी. कॉम. (मराठी आणि इंग्रजी माध्यम), बी. एस. सी., बी. सी. ए., एम. ए. (अर्थशास्त्र), एम. एस. सी. गणित, सूक्ष्मजीवशास्त्र आणि इलेक्ट्रॉनिक्स, पी. एच. डी. वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र, गणित, सूक्ष्मजीवशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स आणि वाणिज्य. विज्ञान, कला आणि वाणिज्य शिक्षण कनिष्ठ महाविद्यालय. संपूर्ण विदर्भात सर्वात सुरुवातीला अनुक्रमे १९७९ आणि १९८७ पासून मायक्रोबायोलॉजी आणि कम्प्युटरचे शिक्षण सुरू करण्यात आले.

या महाविद्यालयामध्ये सन १९८५ पासून राष्ट्रीय सेवा योजना सुरू झाली. आज या चमू मध्ये २०० स्वयंसेवकांना प्रवेश दिला जातो. वर्ष भर महाविद्यालयामध्ये रा. से. यो. चमू मार्फत विविध उपक्रम राबवविले जातात. दर वर्षी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी निर्देशित केल्याप्रमाणे दत्तक ग्राम येथे विशेष श्रम संस्कार शिबिर १०० स्वयंसेवाकांसोबत आयोजित केले जाते व समाज उपयोगी नाविन्यपूर्ण विविध उपक्रम राबवविले जातात.

## -: सदिच्छा भेट व अभिप्राय :-



*स्वावलंबन, स्वयंव्रत, स्वयमशिस्त आणि स्वाभिमान हे गुण परीसासम असून अंगी जोपासणाऱ्या व्यक्ती च्या आयुष्याचे सोने करतात. राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमातून हे सर्व गुण स्वयंसेवकांच्या अंगी रुजविले जातात. रा. से. यो. द्वारा आयोजित विशेष शिबिरातून समाज सेवेची आवड निर्माण होऊन, आपण या देशाचे, समाजाचे काहीतरी देणे लागते हि भावना तसेच आयोजित विविध स्पर्धेतून आत्मविश्वास वृद्धिंगत होऊन स्वतःला सिद्ध करून एखाद्या क्षेत्रात उत्तम करियर करण्याचे धाडस याच काळात निर्माण होते.*

*आपल्या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यालय व इतर सर्व बाबींचा आढावा घेण्यात आला आहे. अत्यंत चांगल्या सुविधा व कार्यक्रम आढावा सुद्धा चांगला आहे. मी आणि डॉ. संजय कोठारी (रा. से. यो. क्षेत्रीय समन्वयक) यांच्या सोबत पहाणी केली अशा सर्व व्यवस्थित बाबीची पडताळणी केली. या करिता आपल्या पथकाकडून गांडुळ खत निर्मिती पाणी संचय प्रकल्प, घन कचरा निर्मिती आपण आपल्या महाविद्यालयाच्या परिसरामध्ये करावे. आपल्या रा से यो पथकाला शुभेच्छा व अभिनंदन करतो.*

**डॉ. राजेश बुरंगे**

**संचालक, रा.से.यो. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती**



Dhamangaon Education Society's
(Hindi Linguistic Minority Educational Institution)
**Adarsha Science, J.B. Arts & Birla Commerce Mahavidyalaya**
**Dhamangaon Rly., Dist. Amravati, Maharashtra, India-444709**
NAAC RE-ACCREDITED 'B++' GRADE (CGPA 2.81)
07222237045 Fax: 07222237087 e-mail: amvdmn2010@gmail.com
Principal
Dr. Yogendra B. Gandole 9421737928 (M) 07222238085 (R) e-mail: ygandole@gmail.com

No. Date:

## आभारपत्र

प्रति,
मा. डॉ. राजेश बुरंगे,
संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

महोदय,

आपण आमच्या महाविद्यालयास दिनांक ०९.०२.२०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना कार्यालय व राष्ट्रीय सेवा योजना पथकास भेट दिली. आपण राष्ट्रीय सेवा योजना विभागाची तपासणी केली तसेच महाविद्यालयास राष्ट्रीय सेवा योजना आवश्यक साहित्य वितरीत केले व आम्हाला अमूल्य असे मार्गदर्शन केले. त्याबद्दल आम्ही आपले अत्यंत आभारी अहोत.

भविष्यात सुद्धा आम्हाला आपले मार्गदर्शन राहील या अपेक्षेसह,

धन्यवाद ....!

प्राचार्य
डॉ. वाय. बी. गांडोळे

दिनांक: ०९.०२.२०२१

ठिकाण: रा. से. यो. कार्यालय, आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे.

विद्याधनं सर्वधन प्रधानम्

**Website: www.adarshamv.org**
Address: Anjansingi Road, Dhamangaon Railway, District Amravati, Maharashtra, India 444709

W – 2603

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्न रा से यो महाविद्यालये**

**राष्ट्रीय सेवा योजना**

## कार्यक्रम अधिकारी

## माहिती पत्र



- कार्यक्रम अधिकारी संपूर्ण नाव : **श्रीकांत प्रकाश पाटील**
- महाविद्यालयाचे नाव : आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे.
- दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक : ९०१११२३०३७
- जन्म तारीख : ०१.०७.१९८६
- व्याख्याता नेमणूक तारीख : ०१.०२.२०१४
- अध्यापनाचा विषय : वनस्पतीशास्त्र
- कार्यक्रम अधिकारी नेमणूक तारीख : २१.०६.२०२१
- प्रशिक्षित : नाही
- होय तर स्थळ व कालावधी : निरंक
- रासेयो कार्यक्रम अधिकारी निवासी पत्ता व दूरध्वनी : “गुरुकृपा” प्लॉट नंबर २०, पांडे नगर, धामणगाव रेल्वे, जि. अमरावती ४४४७०९
- सुट्टीच्या काळात संभाव्य पत्ता : मु. पो. मुडाणा, त. महागाव., जि. यवतमाळ
- भ्रमणध्वनी क्रमांक : ९०१११२३०३७
- ई. मेल आयडी (अत्यंत आवश्यक) : **bionicshri@gmail.com**
- विशिष्ट नैपुण्य : PLANT PATHOLOGY

उपरोक्त माहिती कार्यालयीन अस्ता ऐवजाच्या आधारे सत्य आहे.

स्वाक्षरी व शिक्का

प्राचार्य

W – 2603

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संलग्न रा से यो महाविद्यालये**

**राष्ट्रीय सेवा योजना**



## महिला कार्यक्रम अधिकारी

## माहिती पत्र

- कार्यक्रम अधिकारी संपूर्ण नाव : **डॉ. पूनम गहुकर**
- महाविद्यालयाचे नाव : आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे.
- दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक : ८८८८१९०३८२
- जन्म तारीख : १९.०३.१९८२
- व्याख्याता नेमणूक तारीख : ०१.०२.२०२०
- अध्यापनाचा विषय : संस्कृत
- कार्यक्रम अधिकारी नेमणूक तारीख : २३.१०.२०२१
- प्रशिक्षित : नाही
- होय तर स्थळ व कालावधी : निरंक
- रासेयो कार्यक्रम अधिकारी निवासी पत्ता व दूरध्वनी : C/O डॉ. ऋषिकेश उमप, नवीन राठी नगर, धामणगाव रेल्वे
- सुट्टीच्या काळात संभाव्य पत्ता : C/O डॉ. ऋषिकेश उमप, नवीन राठी नगर, धामणगाव रेल्वे
- भ्रमणध्वनी क्रमांक : ८८८८१९०३८२
- ई. मेल आयडी (अत्यंत आवश्यक) : **gapoonam2@gmail.com**
- विशिष्ट नैपुण्य : भाषण कौशल्य, सूत्रसंचालन कौशल्य

उपरोक्त माहिती कार्यालयीन अस्ता ऐवजाच्या आधारे सत्य आहे.

स्वाक्षरी व शिक्का

प्राचार्य

आदर्श विज्ञान, ज. भा कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे

राष्ट्रीय सेवा योजना २०२१-२२

आपत्ती व्यवस्थापन चमू (DISASTER MANAGEMENT TEAM) 2021-22

| अ. क्रं. | विद्यार्थ्यांचे नाव | मोबाईल | ई मेल |
|---|---|---|---|
| 1. | ऋषभ गजानन ठाकरे-अध्यक्ष | ९०६७७१२००२ | rushabhthakare061101@gmail.com |
| 2. | रिना अशोक कुमरे-उपाध्यक्ष | ९३०७३१३२३४ | rinakumare546@gmail.com |
| 3. | पूनम कुहरडकर-सचिव | ८०८०८२५६९३ | Punamkurhadkar8@gmail.com |
| 4. | चंचल पंचबुद्धे - कोषाअध्यक्ष | ९३०९९०८१४४ | chanchalpanchabuddhe@gmail.com |
| 5. | चंचल खोत - महिला प्रतिनिधी | ७५१७००१८५२ | Chanchalkhot4@gmail.com |
| 6. | प्रज्वल आरेकर-व्यवस्थापन सचिव | ९२८४६५७७६१ | prajwalarekar456@gmail.com |
| 7. | सुवर्णा वंजारी -सदस्य | ८६००६५३२२१ | Suwarnawanjari234@gmail.com |
| 8. | आकाश महात्मे -सदस्य | ८६००६५३२२१ | akashmahatme43@gmail.com |
| 9. | तेजस वाळके -सदस्य | ९३२५७८९६९१ | tejaswalke31@gmail.com |
| 10. | वैष्णवी निखाडे-सदस्य | ७४९९७३५०४४ | Vaishnavinikhade76@gmail.com |
| 11. | शुभम निखाडे-सदस्य | ९६०४०२०२४७ | Shubhamnikhade93@gmail.com |
| 12. | प्रज्वल गडकरी – सदस्य | ८७६६७६४५७४ | Prajwalgadakari198@gmail.com |
| 13. | तेजस गावारले | ७३७८७८३३५१ | Tejasgawarle27@gmail.com |

रा. से यो. कार्यक्रम अधिकारी
प्रा. श्रीकांत पाटील

प्राचार्य
डॉ. वाय. बी. गांडोळे

## राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार मंडळ



रा. से. यो. सल्लागार मंडळ २०२१-२२ सभा

| अनु. क्रं. | राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार मंडळ सदस्य |
|---|---|
| १ | डॉ. योगेंद्र गांडोळे (प्राचार्य) |
| २ | डॉ. डी. के. शृंगारे (माजी कार्यक्रम अधिकारी) |
| ३ | डॉ. के. एच. बारापात्रे (माजी कार्यक्रम अधिकारी) |
| ४ | प्रा. जितेंद्र सुर्यवंशी (माजी कार्यक्रम अधिकारी) |
| ५ | डॉ. नरेंद्र नागपुरे (माजी कार्यक्रम अधिकारी) |
| ६ | डॉ. एम. वाय. कोपुलवार (माजी महिला कार्यक्रम अधिकारी) |
| ७ | श्री चेतन कोठारी (समाजसेवक, स्थानिक रक्तदान समिती अध्यक्ष) |
| ८ | श्री. एस. डी. डहाके (लेखापाल) |
| ९ | कु. सोनाली काळपांडे (रा. से. यो. स्वयंसेवक व विद्यार्थी प्रतिनिधी) |
| १० | प्रज्वल आरेकर (रा. से. यो. स्वयंसेवक व विद्यार्थी प्रतिनिधी) |
| ११ | सुवर्णा वंजारी (रा. से. यो. स्वयंसेवक व विद्यार्थी प्रतिनिधी) |

| राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार मंडळ सभेचे दिनांक : सत्र २०२१-२२ | | |
|---|---|---|
| १. | सत्र पूर्व सभा | २९.०९.२०२१ |
| २. | सत्र शेवटी सभा | ०५.०५.२०२२ |

## १. सूर्य नमस्कार कार्यक्रम

भारतात वसंत पंचमी निमित्त सूर्य नमस्कार व आरोग्य विषयक कर्म करण्याची परंपरा प्रचलित आहे. त्यालाच अनुसरून व भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या अनुषंगाने संपूर्ण देशभर 75 करोड सूर्य नमस्कार करण्याचा संकल्प समाजातील विविध आरोग्य संबंधी संघटनांनी केलेला आहे व त्याचाच एक भाग म्हणून धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथे शारीरिक शिक्षण व क्रीडा विभाग, सामाजिक दायित्व कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत बोधी बुडोकॉन कराटे असोसिएशन चमू व आदर्श महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्या सोबत ११०० सूर्य नमस्कार पूर्ण करण्याचा उपक्रम केला गेला. पूर्वसूचनेप्रमाणे सकाळी ६.३० वाजता सर्व १०० जण नियमितपणे वार्म अप करीत कराटे काता करून सूर्य नमस्कार साठी सज्ज झाले. सुरुवातीला शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या प्रमुख यानी प्रस्तावीक व सूर्य नमस्कार याचे महत्व उपस्थितांना समजून सांगीतले. महाविद्यालयाच्या प्रांगणात आधी कुणाल गवारले, प्रतिक पंचबुद्धे, राम बेलोनकर यांनी सूर्य नमस्काराचे प्रात्यक्षिक करून दाखविले. व सूर्याच्या १२ नामोच्चाराने प्रत्येकी १२ सूर्य नमस्कार करून शिस्तीत महा यज्ञ पार पाडला. काही विद्यार्थी व शिक्षकांनी घरून सूर्य नमस्कार केले व online प्रतिज्ञा घेतली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ योगेंद्र गांडोळे यांच्यासह डॉ माधुरी कोपुलवार क्रीडा विभाग प्रमुख, डॉ नरेंद्र नागपुरे सामाजिक दायित्व कक्ष समन्वयक, श्रीकांत पाटील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, सचिन मून मुख्य कराटे प्रशिक्षक, शिलानंद झामरे, सचिव बोधी बुडोकॉन कराटे असोसिएशन, डॉ दीपक श्रृंगारे, डॉ चिंचमलादपुरे, प्रा. सौ. बिरे, मैत्रेयी पाठक, कार्तिक, प्रज्वल, शिवा व इतर सर्व विद्यार्थी बांधव तसेच कराटे चमू उपस्थित होते

| अनु. क्रं. | कार्यक्रमाचे नाव | लाभार्थी (OUTCOME) |
|---|---|---|
| १. | सूर्य नमस्कार कार्यक्रम (११०० सूर्य नमस्कार)<br>१. प्रणामासन (Pranamasana - The Prayer Pose)<br>२. हस्तउत्तनासन (Hasta Uttanasana - Raised Arms Pose)<br>३. पादहस्तासन (Padahastasana - Standing Forward Bend)<br>४. अश्व संचालनासन (Ashwa Sanchalanasana - Equestrian Pose)<br>५. दंडासन (Dandasana - Staff Pose )<br>६. अष्टांग नमस्कार (Ashtanga Namaskara - Eight Limbed pose or Caterpillar pose)<br>७. भुजंगासन (Bhujangasana - Cobra Pose)<br>८. अधोमुख शवासन (Adho Mukha Svanasana - Downward-facing Dog Pose)<br>९. पादहस्तासन (Padahastasana - Hand Under Foot Pose) | २०० |







## २. जल संधारण प्रकल्प अकोला सहभाग ("विद्यापीठ स्तरीय जल संधारण प्रतिकृती स्पर्धा")


राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारे आयोजित जलसंधारण प्रकल्प शिबिर, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे दिनांक ०४.१०.२०२१ रोजी आयोजित करण्यात आले होते. या जल संधारण प्रकल्पामध्ये आदर्श महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना चमूतील १. कु. वैष्णवी राऊत, २. दीपक पचारे या दोन विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.

| अनुक्रम | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग |
|---|---|---|
| १ | कु. वैष्णवी नरेंद्र राऊत | बी. कॉम. भाग ३ |
| २ | दीपक राजू पचारे | बी. कॉम. भाग ३ |












## ३. आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेला उपस्थिति ०४ विद्यार्थी

दिनांक ०४ ते ०५ मार्च २०२२ या कालावधी मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारे आयोजित आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेला आदर्श महाविद्यालयाच्या रा से यो चमू च्या ०४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला व आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध पैलूंचा अंगिकार केला.

| क्रं. | विद्यार्थ्याचे नाव | इ मेल आयडी | जन्म दिवस | मोबाईल नं. |
|---|---|---|---|---|
| १. | कु. पूनम दिवाकर कुऱ्हाडकर | punamkurhadkar8@gmail.com | ०५.०७.२००१ | ८०८०८२५६९३ |
| २. | कु. रीना अशोक कुमरे | rinakumbre546@gmail.com | १२.०१.२००२ | ९६०७३१३२३४ |
| ३. | वृषभ गजानन ठाकरे | rushabhthakare061101@gmail.com | ०६.११.२००१ | ९०६७७१२००२ |
| ४. | प्रज्वल जगदीश आरेकर | prajwalarekar456@gmail.com | २४.१२.२००२ | ९२८४६५७७६१ |











### ४. मिशन युवा स्वास्थ्य निमित्त कोव्हिड १९ प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम

महाराष्ट्र शासनाकडून आलेल्या निर्देशानुसार दिनांक ३०.११.२०२१ युवा स्वास्थ्य मोहिमेअंतर्गत आदर्श महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजने तर्फे कोव्हिड १९ प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम राबवण्यात आली. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला शासकिय आदेशानुसार महाविद्यालयाच्या दर्शनीय ठिकाणी व आत मध्ये येण्याच्या मार्गावर लसीकरणाचे फलक लावण्यात आले. या मोहिमे अंतर्गत ग्रामीण रुग्णालय, धामणगाव रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये डॉक्टर व नर्स स्टाफ लास उपलब्ध करून विद्यार्थ्यांना व गावकऱ्यांना लसीकरण केले. या मध्ये महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान केले.







## ५. रक्त दान शिबिर व कोव्हिड १९ प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम

गेल्या २५ वर्षापासून सुरू असलेली परंपरा धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती सोबत संलग्नित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय येथे दिनांक १२ जानेवारी २०२२ रोजी भव्य रक्तदान शिबिर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. या शिबिराला धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे पदाधिकारी यांची उपस्थिति लाभली. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन अध्यक्ष ॲड. रमेशचंद्रजी चांडक, यांच्या हस्ते पार पडले. त्यांच्या सोबत ॲड. आशिषकुमारजी राठी, श्री रमेशचंद्रजी पसारी, श्री प्रदिपकुमारजी लुणावत, धामणगाव रक्तदान समिती चे अध्यक्ष श्री चेतन कोठारी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांची उपस्थिति होती. या संपूर्ण उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक श्री जितेंद्र सुर्यवंशी यांनी आपल्या अनोख्या शैलीत केले व उपस्थितांची मने जिंकली. शिबिराची सुरुवात स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पदाधिकाऱ्यांच्या हस्ते पूजन करून झाले. सदर रक्तदान शिबिरासाठी जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालय सावंगी मेघे, वर्धा येथून रक्तदान पेढी चे प्रमुख डॉ. सुनील चावरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची चमू उपस्थित होती. या रक्तदान शिबिराला ८४ रक्तदाते म्हणून लाभले त्यांच्या कडून ७१ यूनिट रक्त पेढी ला मिळाले. रक्तदान पेढी चे प्रमुख डॉ सुनील चावरे यांनी या कोरोना काळात सुद्धा महाविद्यालय व इतर शैक्षणिक संकुल बंद असूनही तरुणाई चा उस्फुर्त सहभाग बघून आश्चर्य व्यक्त केले. या शिबिराच्या सुरुवातीला धामणगाव एज्युकेशन सोसायटी चे अध्यक्ष ॲड. चंद्रशेखरजी चांडक यांनी आपले मनोगत व्यक्त केले व राष्ट्रीय सेवा योजना आदर्श महाविद्यालय धामणगाव यांच्या कडून युवक दिना निमित्त आयोजित रक्तदान शिबिराचे उत्कृष्ट रित्या केलेल्या आयोजनाची स्तुति केली व सोसायटी तर्फे सर्वांचे अभिनंदन केले. २५ वर्षापासून सतत चालू असलेली ही रक्तदान शिबिर आयोजनाची परंपरा अजूनही चालू आहे याचे आश्चर्य व्यक्त करून पुढील भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर संपूर्ण रक्तदाते व सावंगी मेघे वर्धा येथून आलेल्या रक्त पेढी चे धामणगाव एज्युकेशन सोसायटी च्या वतीने धन्यवाद मानले .

रक्तदानाची सुरुवात महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक व वाणिज्य विभाग येथे कार्यरत, माजी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे यांनी आपले रक्तदान करून केली व शेवट हा याच महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीपक शृंगारे सरांनी केला. सोबतच महाविद्यालयाच्या इतर शिक्षक, रा.से.यो., रा. छा. से., महाविद्यालयीन आजी व माजी विद्यार्थी, धामणगाव वासी, पत्रकार बंधु व इतर गावकरी मंडळी यांनी रक्तदान करून मोलाचे सहकार्य केले. हे संपूर्ण रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर व संपूर्ण राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना चे स्वयंसेवक यांनी अथक परिश्रम घेतले.


धामणगाव एज्युकेशन सोसायटी
द्वारा संचालित
आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य
महाविद्यालय, धामणगाव रेल्वे
राष्ट्रीय सेवा योजना
द्वारे आयोजित
युवा दिन निमित्त
भव्य रक्तदान शिबीर
वर्ष 25 वे
या रक्तदान शिबिरामध्ये रक्तदान करावे व आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे
असे आवाहन करण्यात येत आहे
रक्तदान करण्यासाठी आपण सर्व आमंत्रित आहात
दिनांक: 12.01.2022, वेळ: सकाळी 10.30 ते 01.30 पर्यंत, स्थळ: सभागृह
रक्तदान जीवन दान
राष्ट्रीय सेवा योजना व समस्त आदर्श महाविद्यालय परिवार


12 जानेवारी 2022
राष्ट्रीय युवक दिना निमित
भव्य रक्तदान शिबीर
जाहीर आवाहन
धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथे दिनांक 12 जानेवारी 2022 रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 1.30 पर्यंत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. त्या निमिताने आपणास या सोनेरी समाजकार्यामध्ये सहभागी होण्याची व रक्तदान करण्याची सुवर्ण संधी आहे. इच्छुक व्यक्तींनी या शिबिराची पुढील दिलेल्या लिंक ला स्पर्श करून किंवा QR कोड स्कॅन करून रक्तदान करण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करावी व 12 जानेवारी 2022 रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 1.30 दरम्यान रक्तदान करून आपले राष्ट्रीय हिताचे कर्तव्य पार पाडावे असे आवाहन करण्यात येत आहे.
ऑनलाईन नोंदणी साठी लिंक व QR कोड: https://forms.gle/MRBFyofNdvB6FWkC6
रक्तदान शिबिराचे आयोजक
राष्ट्रीय सेवा योजना
आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे
रक्त दान जीवन दान


रक्तदान शिबीर
१२ जानेवारी
युवक दिन




रक्तदान शिबीर



### ६. रा.से.यो. उद्घाटन सोहळा

धामणगाव एज्युकेशन सोसायटी हिंदी भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था द्वारा संचालित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्घाटन सोहळा २०२१-२२ दिनांक २३.१०.२०२१ या दिवशी थाटात पार पडला. या उद्घाटन सोहळ्यामध्ये अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी भूषविले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे आणि मार्गदर्शक म्हणून डॉ. आकाश येंडे (एम. डी. कम्युनिटी मेडिसिन) उपस्थित होते. या कार्यक्रमा मध्ये त्यांनी कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या रा से यो स्वयंसेवकांना कोव्हीड १९ लसीकरणाचे महत्व, कोरोना काळातील कठीण दिवस, राष्ट्रीय सेवा योजनेचे आपल्या सामाजिक जीवनातील महत्व अशा अनेक विषयावर मोलाचे मार्गदर्शन केले. या उद्घाटन सोहळ्या मध्ये माजी कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे व डॉ. एम. वाय. कोपुलवार यांच्या हस्ते पद हस्तांतरण सोहळा पार पाडण्यात आला. या मध्ये त्यांनी आपला कार्यक्रम अधिकारी हा कार्यभार प्रा. श्रीकांत पाटील यांच्याकडे रा से यो बिल्ला देऊन सोपविला व सोबतच सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे व महिला सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर यांना सुद्धा कार्यभार सोपवण्यात आला. या प्रसंगी डॉ. नरेंद्र नागपुरे यांनी आपल्या विशिष्ट शैली मध्ये स्वत:चा ०६ वर्षाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यकाळ आणि पुढील रा.से.यो. ची वाटचाल या वर भाषण केले व उपस्थितांना मंत्र मुग्ध केले. या उद्घाटन सोहळ्याला महाविद्यालयाच्या इतर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे सरांनी केला. या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने सर्वप्रथम "स्वच्छता हीच सेवा" या साधुक्ति चा वापर करून महाविद्यालयीन परिसर स्वच्छता अभियान राबवण्यात आले. नंतर कार्यक्रमाच्या उत्तरार्धात राष्ट्रीय सेवा योजना आणि ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने शासन नियमानुसार "भव्य कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम" महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात आली. या लसीकरण मोहिमे अंतर्गत महाविद्यालयाच्या ११९ विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले सोबतच काही शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पण आपले लसीकरण करून घेतले. या दरम्यान काही गावकरी मंडळीनी सुद्धा लसीकरण करण्यासाठी या मोहिमे मध्ये सहभाग घेतला. ही लसीकरण मोहीम पूर्णत्वास नेण्यासाठी ग्रामीण रुग्णालय धामणगाव रेल्वे येथील वैद्यकीय चमू आणि रा.से.यो. स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेतले.


उद्घाटन सोहळ्याचे व लसीकरण मोहिमेचे संपूर्ण नियोजन रा.से.यो स्वयंसेवकांनी केले. या मध्ये सूत्रसंचालन वैष्णवी राऊत व सिमरन तुळसकर यांनी केले, प्रमुख पाहुण्यांचा परिचय नव नियुक्त सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे यांनी केले व शेवटी आभार प्रदर्शन अथर्व गावंडे याने केले. चंचल खोत, चंचल पंचबुद्धे, प्रज्वल आरेकर, सुवर्णा वंजारी, भैरवी गांडोळे, साक्षी माळोदे, कृष्णा चांडक, मृणाल सावंत, अनुराधा चांडक, वैष्णवी सौन्दरकर, खुशाली तर्हेकर, अशा अनेक रा. से. यो. चे वरिष्ठ व कनिष्ठ स्वयंसेवकांनी कार्यक्रम नियोजनात अथक परिश्रम घेतले.




















अध्ययन समाचार

बुधवार दि.२७ऑक्टोबर २०२१

आदर्श महाविद्यालय धा.रेल्वे येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन दिन थाटात साजरा
रा.से.यो. उद्घाटन सोहळ्या निमित्त भव्य कोव्हीड १९ प्रतिबंधात्मक लसीकरण मोहीम

## ७. हुतात्मा दिन

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित स्थानिक आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या मार्गदर्शखाली राष्ट्रीय सेवा योजना व इतिहास विभागाद्वारे आयोजित राष्ट्रीय हुतात्मा दिन व महात्मा गांधी पुण्यतिथी निमित्त आदरांजली सोहळा संपन्न झाला. ३० जानेवारी हा दिवस राष्ट्रीय हुतात्मा दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा करण्यात येतो. महाविद्यालयाला प्राप्त शासकिय परिपत्रकानुसार देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केलेल्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ आदर व्यक्त करण्यासाठी महाविद्यालयात रविवार दिनांक ३० जानेवारी २०२२ रोजी प्राचार्य डॉ. योगेंद्र गांडोळे यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक- शिक्षकेत्तर बंधु बघिनी यांचे प्रमुख उपस्थितित ०२ मिनिटे मौन (स्तब्धता) पाळून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. किशोर बारापात्रे यांनी केले. कार्यक्रमाची रूपरेषा व आयोजनाचा हेतू त्यांनी सांगीतला. कार्यक्रमाची कार्यवाही राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकांत पाटील यांनी केली. दिप प्रज्वलन व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला हार अर्पण सोहळ्यांनंतर त्यांच्या पुण्यतिथी निमित्त आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाला प्राध्यापक डॉ. माधुरी कोपुलवार, प्रा डॉ. संजय पाटील, प्रा डॉ. सूर्यकांत रोडगे, प्रा. डॉ. दीपक शृंगारे, प्रा डॉ. अमोल बंड, प्रा डॉ. जितेंद्र बारूळकर, डॉ. फुरकान पठान, डॉ. माया मावळे, डॉ. ऋषिकेश कुरळकर, डॉ. विष्णू सदाफळे, श्री वसंत तायडे, श्री निलेश किरसान, श्री नवीन शर्मा, श्री नंदकिशोर यादव, श्री भगत, श्री गुणवंत कुमरे, डॉ. निलेश सोनुने, प्रा. जितेंद्र सुर्यवंशी, डॉ. ओबेद कुरेशी, डॉ. श्वेता शर्मा तसेच अन्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व रा. से. यो. चे विद्यार्थी मोठ्या संखेने उपस्थित होते.






## ८. माझी वसुंधरा

स्थानिक धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श महाविद्यालय येथे दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा १ सप्टेंबर, बुधवार रोजी अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे शहरातील आदर्श महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना तर्फे वृक्षारोपण कार्यक्रम कॉलेज च्या प्रांगणात आयोजित करण्यात आला होता, या वृक्षा  रोपण कार्यक्रमांमध्ये सुरुवातीला माझी वसुंधरा या आशयाची शपथ घेण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना तर्फे 100 झाडे लावण्याची संकल्पना महाराष्ट्र शासनाच्या माझी वसुंधरा या उपक्रम अंतर्गत राबवण्यात आली, या वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. योगेंद्र बी. गांडोळे सर यांच्या हस्ते वृक्ष रोपण करून झाली. या वेळी महाविद्यालयातील सर्व राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना चे विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या प्रसंगी वृक्ष लागवड करून आपला सहभाग दर्शविला. व झाडे लावा झाडे जगवा असा संदेश या निमित्ताने देण्यात आला.

या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकांत पाटील सर, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे, राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारी, ले. श्री ए. बी. बंड सर, रा.से.यो. माजी कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे सर, क्रीडा व खेळ विभागाच्या प्रमुख डॉ. एम वाय कोपुलवार मॅडम, IQAC प्रमुख डॉ. आनंद नरांजे, वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख श्री संदीप पेंदाम सर, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस. ओ. कुरेशी सर, डॉ. चिंचमलादपुरे सर, ग्रंथपाल डॉ. कुरळकर सर, डॉ.सौरभ घोगरे सर, डॉ. मुंगसे सर, डॉ. स्वप्नील शेळके सर आदी उपस्थित होते, तर साहिल कांबळे, आकाश महात्मे, मानसी काळे, प्रतिक ठाकरे, सुवर्णा वंजारी, देवयानी झांबरे, जागृती महाजन, वैष्णवी वानखेडे,  समीक्षा वडूरकर, साक्षी गोडबोले, पायल गुप्ता,लक्ष्मी सोन्धीया, भावना चवरे इत्यादी रा. से. यो. स्वयंसेवकांनी व राष्ट्रीय छात्र सेने च्या कॅडेट नि कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता अथक परिश्रम घेतले.










आपल्या शहरातील प्रत्येक बातमी

आता रोज रहा अपडेट!

# अध्ययन समाचार

संपादक : जितेंद्र रोडे

SOCIAL MEDIA EDITION

दि. १ सप्टेंबर २०२१

## राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांचा संयुक्त उपक्रम

# आदर्श महाविद्यालय येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

धा.रेल्वे दि. १ | प्रज्योत पहाडे

स्थानिक धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श महाविद्यालय येथे दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा १ सप्टेंबर, बुधवार रोजी अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे शहरातील आदर्श महाविद्यालय व राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना तर्फे वृक्षारोपण कार्यक्रम कॉलेजच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. या वृक्षारोपण कार्यक्रमांमध्ये सुरुवातीला 'माझी वसुंधरा' या आशयाची शपथ घेण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना तर्फे १०० झाडे लावण्याची संकल्पना महाराष्ट्र शासनाच्या 'माझी वसुंधरा' या उपक्रम अंतर्गत राबवण्यात आली, या वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.योगेंद्र बी.गांडोळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून झाली. यावेळी महाविद्यालयातील सर्व राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना चे विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी या प्रसंगी वृक्ष लागवड करून आपला सहभाग दर्शविला व झाडे लावा झाडे जगवा असा संदेश या निमित्ताने देण्यात आला.

या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.श्रीकांत पाटील, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे, राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारी, ले.ए.बी.बंड, रा.से.यो. माजी कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे, क्रिडा व खेळ विभागाच्या प्रमुख डॉ. एम वाय कोपलवार, आयक्यूएसी प्रमुख डॉ.आनंद नरांजे, वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख संदीप पेंदाम, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस.ओ. कुरेशी, डॉ. चिचमलादपुरे, ग्रंथपाल डॉ. कुरळकर सर, डॉ.सौरभ धोगरे, डॉ. मुंगसेर, डॉ. स्वप्नील शेळके आदी उपस्थित होते.

तर साहिल कांबळे, आकाश महात्मे, मानसी काळे, प्रतिक ठाकरे, सुवर्णा वंजारी, देवयानी झांबरे, जागृती महाजन, वैष्णवी वानखेडे, समीक्षा वडूरकर, साक्षी गोडबोले, पायल गुप्ता,लक्ष्मी सोनोवा, भावना चवरे इत्यादी रा.से.यो. स्वयंसेवकांनी व राष्ट्रीय छात्र सेने च्या कॅडेट यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता अथक परिश्रम घेतले.

## ९. आजादि का अमृत महोत्सव (चित्रफित प्रदर्शन)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती कडून प्राप्त पत्रकानुसार **(पत्र क्रमांक: संबाअवी/रासेयो/१७/७६/२०२१)** भारताच्या स्वातंत्र्याची ७५ वर्षे आझादी का अमृत महोत्सव हा उपक्रम आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे साजरा करण्यात आला. या महोत्सवा अंतर्गत दिनांक १५ ऑगस्ट २०२१ ते ०२ ऑक्टोबर २०२१ पर्यंत वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. कोव्हीड-१९ चा काळ बघता सामाजिक अंतर पाळून सादर कार्यक्रम हे आभासी पद्धतीने घेण्यात आले. महाविद्यालयाच्या रा. से. यो. तर्फे पुढील उपक्रम राबवण्यात आले.


राष्ट्रीय सेवा योजने तर्फे राबवविलेले उपक्रम पुढील प्रमाणे:


**उपक्रम I**

**निबंध स्पर्धा**

सर्व प्रथम महाविद्यालयामध्ये **भारतीय स्वातंत्र्य लढा** या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या निबंध स्पर्धेसाठी आभासी पद्धतीचा (गुगल फॉर्म चा) वापर करून आभासी पद्धतीने विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली व हस्ताक्षरात निबंध लिहून अपलोड करण्याचे आवाहन करण्यात आले. या निबंध स्पर्धेच्या निकाल तयार करण्यासाठी परीक्षक म्हणून आदर्श महाविद्यालयाच्या संस्कृत विभागाच्या प्रमुख डॉ. पूनम गहुकर यांना आमंत्रित करण्यात आले होते. सदर निबंध स्पर्धेमध्ये एकूण १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला त्यामधून प्रथम ३ क्रमांक निवडण्यात आले. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक, कु. सोनाली काळपांडे, बी. एस. सी भाग २, सेम २ च्या विद्यार्थिनीने पटकावला. द्वितीय क्रमांक कु. अपर्णा सपाटे, बी. एस. सी भाग २ सेम ५ च्या विद्यार्थिनीने पटकावला. तृतीय क्रमांक कु. प्रतीक्षा गाडलिंग बी. कॉम २ सेम ५ हिने पटकावला. या निबंध स्पर्धेचे आयोजन आभासी पद्धतीने गुगल फॉर्म चा वापर करून घेण्यात आली असून त्याची लिंक पुढील प्रमाणे आहे.

https://drive.google.com/drive/u/0/folders/16Ew9yD8Um3o486peiG7coR5JxC_cBXaO



स्पर्धा घेतलेली गुगल फॉर्म चे डीटेल्स

**उपक्रम II**

## स्वातंत्र्य सेनानी आभासी चित्रफित प्रदर्शन

या उपक्रमाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांचा व्हाट्स-अप ग्रुप वर आभासी पद्धती ने राष्ट्र पिता महात्मा गांधी, सरदार पटेल, नेताजी सुभाष चंद्र बोस व इतर महान व्यक्तीच्या जीवनावर आधारित तसेच भारतीय स्वातंत्र्य सेनानी आणि अलक्षित नायकांच्या जीवनावर आधारित माहिती व चित्रफित प्रदर्शन आभासी पद्धतीने करण्यात आले. हे सर्व करताना त्याची व्ही.डी.ओ क्लिप बनवून सदर ग्रुप वर अपलोड करण्यात आली. सदर उपक्रमामध्ये जवळपास संपूर्ण रा. से. यो. स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. प्रसारण करण्यासाठी YouTube Channel चा उपयोग करण्यात आला. हे चानेल चे नाव NSS- Adarsha Mahavidyalaya, Dhamangaon Rly असून वरील चित्रफित प्रदर्शन केलेली लिंक ही पुढील प्रमाणे आहे. https://www.youtube.com/watch?v=FLclXvxZahE







**आभासी चित्रफित प्रदर्शन**












**१०. गांडुळ खत निर्मिती प्रकल्प**

राष्ट्रीय सेवा योजना, वनस्पतीशास्त्र विभाग आणि प्राणिशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या वनस्पती उद्यानामध्ये गांडुळ खत निर्मिती प्रकल्प (VERMICOMPOST PRADUCTION UNIT) उभारला आहे. या प्रकल्पा अंतर्गत महाविद्यालयाच्या परिसरामध्ये आणि उद्यानांमध्ये जो घन कचरा तयार होतो त्याचे नैसर्गिक विघटन गांडुळ च्या सहायाने करून गांडुळ खत तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. हा प्रकल्प संपूर्ण कार्यान्वीत झाला आहे. या प्रकल्पा अंतर्गत महाविद्यालयामध्ये दर वर्षी २५० किलो घन कचऱ्याचे नैसर्गिक विघटन करून जवळपास ४० किलो गांडुळ खत निर्मिती अपेक्षित आहे.






**११. मतदार दिवस**

दिनांक २५.०१.२०२२ रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापिठ अमरावती अंतर्गत धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व राज्यशास्त्र विभाग यांचा संयुक्त विद्यमाने "२५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिवस" साजरा करण्यात आला. या दिवशी महाविद्यालयातील संपूर्ण विद्यार्थ्यांना विविध कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यासाठी सूचना देण्यात आल्या. या मध्ये १. निबंध स्पर्धा, २. मतदान प्रतिज्ञा, ३. नवीन मतदार यांचा सत्कार (०१ मुलगा व ०१ मुलगी) अशे कार्यक्रम राबवण्यात आले. या दरम्यान महाविद्यालयामध्ये आभासी पद्धतीने राष्ट्रीय मतदार दिना निमित्त आभासी पद्धतीने प्रतिज्ञा घेण्यात आली व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी आपल्या "लोकशाही मध्ये मतदान प्रक्रियेचे महत्व" यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व उपस्थित निवडक विद्यार्थी यांना सोबत घेऊन मतदान प्रतिज्ञा चे वाचन केले. महाविद्यालयाचे नवीन मतदार १. कु. मानसी काळे, २. प्रतिक ठाकरे यांना पुष्प गुच्छ देऊन त्यांचा सत्कार प्राचार्यांकडून करण्यात आला. महाविद्यालयामध्ये जवळपास १६५ विद्यार्थ्यांनी आभासी पद्धतीने मतदार प्रतिज्ञा घेतली. या संपूर्ण कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच राज्यशास्त्र विभाग प्रमुख व रा. छा. से. अधिकारी प्रा. अमोल बंड, रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकांत पाटील, रा. से. यो. सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर, यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम पूर्णत्वास नेला. या संपूर्ण कार्यकमाची धुरा रा. छा. से. व रा. से. यो. च्या स्वयंसेवकानी सांभाळली. या मतदान प्रतिज्ञा घेते वेळी महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिति लाभली.

## १२. “२५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिवस” निमित्ताने आयोजित निबंध स्पर्धा:

या निबंध स्पर्धेला महाविद्यालयाच्या एकूण १२ विद्यार्थ्यांनी आपल्या नावाची नोंदणी करून निबंध संबंधित विषय शिक्षकाला आभासी पद्धतीने पाठवले त्या मधून ०३ विजेत्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यांना प्रमाणपत्र व भारतीय लोकशाहीबद्दल प्रेरणात्मक पुस्तके भेटवस्तू म्हणून देण्याचे ठरविले आहे. विजेत्यांची नावे पुढील प्रमाणे

| अनु. क्रं. | विद्यार्थ्याचे नाव | वर्ग | स्पर्धेतील क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | **गौरव मेंढे** | **बी. ए. भाग - ३** | **प्रथम** |
| २ | **प्राजक्ता वासनिक** | **बी. कॉम. भाग – १** | **द्वितीय** |
| ३ | **प्रिया हिवरकर** | **बी. कॉम. भाग – २** | **तृतीय** |


**मतदार प्रतिज्ञा:** राष्ट्रीय मतदार दिना निमित्त आभासी पद्धतीने जवळपास १६५ विद्यार्थ्यांनी आभासी पद्धतीने व काही निवडक विद्यार्थ्यांनी कोरोना प्रतिबंधात्मक नियमावली पाळून महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये उपस्थित राहून महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सोबत मतदान प्रतिज्ञा घेतली. त्याचे काही निवडक फोटो पुढील प्रमाणे




**व्यासपीठावर उपस्थित मान्यवर**




**मान्यवर मतदार शपथ घेताना**



आदर्श विज्ञान, ज. भा. कला व बिर्ला वाणिज्य महाविद्यालय धामणगाव रेल्वे जिल्हा अमरावती ४४४७०९

राष्ट्रीय सेवा योजना

राष्ट्रीय मतदार दिवस

मतदाराची प्रतिज्ञा

मराठी

"आम्ही, भारताचे नागरिक लोकशाहीवर निष्ठा ठेवून याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करून आणि मुक्त नि: पक्षपाती व शांतता पूर्ण वातावरणातील निवडणुकींचे पावित्र्य राखून प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा त्यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू."

हिंदी

"हम, भारत के नागरिक लोकतंत्र में अपनी पूर्ण आस्था रखते हुए यह शपथ लेते हैं कि, हम अपने देश की लोकतांत्रिक परंपराओं की मर्यादा को बनाए रखेंगे तथा स्वतंत्र निष्पक्ष एवं शांतिपूर्ण निर्वाचन की गरिमा को अक्षुण्ण रखते हुए निर्भीक होकर धर्म, वर्ग, जाति, समुदाय, भाषा, अथवा अन्य किसी भी प्रलोभन से प्रभावित हुए बिना सभी निर्वाचनो में अपने मताधिकार का प्रयोग करेंगे."

इंग्रजी

"We, the citizens of India having abiding faith in democracy Hereby pledge to uphold the democratic traditions of our country and the dignity of free fair and peaceful elections and to vote in every election fearlessly and without being influenced by a consideration of relation race, cast, language, or any inducement."

जय हिंद....!

Jai Hind....!

**२५ जानेवारी २०२२ रोजी विद्यार्थ्यांनी घेतलेली शपथ**

**नवीन मतदारांचा सत्कार**: शासना कडून आलेल्या आदेशानुसार नवीन पिढी ला लोकशाही चे महत्व पटून देण्यासाठी नाही निवडक नवीन मतदार विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्काराचे फोटो पुढील प्रमाणे.




**कु. मानसी ठाकरे सत्कार स्वीकारताना**




**प्रतिक ठाकरे सत्कार स्वीकारताना**

## १३. मतदार जन जागृती कार्यक्रम

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती कडून प्राप्त परिपत्रकानुसार, राष्ट्रीय सेवा योजना, आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे द्वारा दिनांक ०१.११.२०२१ ते ३०.११.२०२१ या कालावधी दरम्यान मतदार जनजागृती अभियान राबवण्यात आले. या अभियाना दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हे योजन करताना नवीन मतदार विद्यार्थी ज्यांची नावाची नोंद मतदार यादी मध्ये झाली नाही त्यांना केंद्रस्थानी ठेवून विविध कार्यक्रमाचे व उपक्रमाचे महाविद्यालयीन स्तरावर व दत्तक गरम स्तरावर आयोजन करण्यात आले. त्या आयोजित कार्यक्रमाचा तपशील संक्षिप्त स्वरुपात पुढील प्रमाणे आहे.

### १. "मतदार मित्र" संकल्पना:

या संकल्पाने चा वापर करून राष्ट्रीय छात्र सेना चे विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेचे काही निवडक स्वयंसेवक मिळून "मतदार मित्र" ही संकल्पना राबवण्यात आली. या संकल्पाने हे मतदार मित्र स्वयंसेवकानी महाविद्यालय व दत्तक ग्राम स्तरावर विविध कार्यक्रमाचे आयोजन करत मतदार जनजागृती मोहिम पूर्णत्वास नेली. हे काम करताना मतदार मित्रांनी संपूर्ण महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना एकत्र आणून त्यांना मतदान विषयाचे महत्व पटून दिले. मतदान जनजागृती चे बॅनर कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली बनून महाविद्यालयाच्या दर्शनीय ठिकाणी लावले जेणे करून संपूर्ण महाविद्यालयाचे विद्यार्थी ते बघतील व मतदान नोंदणी व प्रक्रिया समजून घेतील. सोबतच जवळच्या तहसील कार्यालयाला भेट देऊन तेथून मतदान नोंदणी फॉर्म आणून महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी करण्यास तांत्रिक रित्या सहाय्य केले.

**मतदान मित्र यादी**

| अनु. क्रं. | मतदार मित्राचे नाव | वर्ग | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १. | वृषभ ठाकरे | बी. कॉम. भाग ३ | ९०६७७१२००२ |
| २. | सिमरन तुळसकर | बी. ए. भाग २ | ७७७४०९८६९२ |
| ३. | कल्याणी ठाकरे | बी. ए. भाग १ | ९३५५६६७५१९० |
| ४. | चंचल खोत | बी. कॉम. भाग ३ | ७५१७००१८५२ |
| ५. | चंचल पंचबुद्धे | बी. कॉम. भाग ३ | ९३०९९०८१४४ |
| ६. | रीना कुमरे | बी. कॉम. भाग ३ | ९३०७३१३२३४ |
| ७. | साक्षी माळोदे | बी. एस.सी. भाग ३ | ७६२०३१७२४० |
| ८. | भैरवी गांडोळे | बी. एस.सी. भाग ३ | ७३७८३२५४६३ |
| ९. | सुवर्णा वंजारी | बी. ए. भाग २ | ८६००६५३२२१ |
| १०. | हिमांशु इंगळे | बी. कॉम. भाग ३ | ८४४६७४८८४५ |
| ११. | साक्षी गोडबोले | बी. ए. भाग २ | ९५०३९२८४४८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | विकास टिकले | बी. ए. भाग २ | ७५६९७७२०५ |
| १३. | आकाश महात्मे | बी. ए. भाग २ | ७७९८६९२५५२ |
| १४. | मानसी काळे | बी. ए. भाग २ | ९२८४७०४८०९ |
| १५. | वैष्णवी डोळे | बी. ए. भाग २ | ९०२१५३१६४२ |
| १६. | शुभम खैरकार | बी. ए. भाग २ | ९३७३२०६९८८ |
| १७ | संस्कृती मांडळे | बी. कॉम. भाग २ | ९६७३६९३३८५ |

### २. मतदान नोंदणी अभियानाचे बॅनर: (राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांचा संयुक्त उपक्रम)

मतदार जनजागृती अभियानाचे दुसरे पाऊल म्हणजे माहिती बॅनर. हे ५*४ फुट आकाराचे बॅनर कार्यक्रम अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली बनून महाविद्यालया मधील दर्शनीय ठिकाणी लावले. त्या बॅनर मध्ये मतदार प्रक्रिये विषयी व नवीन मतदार नोंदणी विषयी संपूर्ण माहिती दर्श्याविण्यात आली.

| अनु क्रं | कार्यक्रमाचे नाव | लाभार्थी (OUTCOME) |
|---|---|---|
| १. | मतदार दिवस | २०० |
| २. | निबंध स्पर्धा | १०० |
| ३. | मतदार जनजागृती | २८ गावे |
| ४. | मतदार मित्र संकल्पना | १५० |
| ५. | मतदान नोंदणी अभियान | १८८ |
| ६. | मतदार जन जागृती कार्यशाळा | ६८ |




धामणगाव एज्युकेशन सोसायटी
हिंदी भाषिक अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था द्वारा संचालित
आदर्श विज्ञान, ज.भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगाव रेल्वे
राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना
यांच्या संयुक्त विद्यमाने
मतदार जनजागृती
01.11.2021 ते 30.11.2021
आपण 18 वर्षाचे झालात का ?
लक्षात ठेवा





राष्ट्रीय सेवा योजना
आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे
नकाशा: धामणगाव रेल्वे
अमरावती
वर्धा
धामणगाव रेल्वे
जन जागृती साठी
निवडलेली गावाची संख्या
37
यवतमाळ
प्रमुख शहर
मतदान जनजागृती केलेली गावे
रेल्वे
मुख्य रस्ते
मतदान जन जागृती अभियान
01.11.2021 ते 30.11.2021
मतदान जनजागृती अभियान अंतर्गत धामणगाव तालुक्या मध्ये जनजागृती केलेल्या गावांचा नकाशा





GPS Map Camera
Mali
Nigeria
Google
Dattapur Dhamangaon, Maharashtra, India
Q4XQ+28W, Lunawat Nagar, Dattapur Dhamangaon,
Maharashtra 444709, India
Lat 20.797558°
Long 78.138343°
22/11/21 11:29 AM

**१४. मतदार जन जागृती कार्यशाळा**


दिनांक २६.११.२०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग द्वारे मतदान जनजागृती कार्यशाळेचे भारतीय संविधान दिनाच्या निमित्ताने आयोजन केले. या कार्यशाळेला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे लाभले व कार्यशाळेचे प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून श्री प्रदीप शेलार, तहसीलदार, धामणगाव रेल्वे व श्री जगदीश मंडपे, नायब तहसीलदार, धामणगाव रेल्वे यांनी उपस्थिति दर्शविली. या कार्यशाळेला महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद, व जवळपास १२३ विद्यार्थी उपस्थित होते. या पैकी नवीन मतदार जास्तीत जास्त संखेने उपस्थित होते.

या कार्यशाळेची सुरुवात आपल्या देशाची संविधान उद्देशिका वाचन करून झाली. या कार्यशाळेमध्ये प्रमुख मार्गदर्शक श्री जगदीश मंडपे यांनी भारतीय लोकशाही मध्ये संविधानाचे स्थान व त्याचे अनन्यसाधारण महत्व या वर भाष्य केले व सोबतच भारतीय लोकशाही मध्ये मतदानाचे प्रक्रियेचे महत्व, मतदान प्रक्रिया, आणि नवीन मतदान नोंदणी विषयी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय बी गांडोळे यांनी मतदार कसे असावेत आणि त्यांनी कोणता विचार बाळगून मतदान करायला पाहिजे व भारतीय संविधान आणि त्यात असलेला मतदानाचा हक्क या बदल सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अमोल बंड यांनी केले व सोबतच भारतीय संविधान त्याचे स्वरूप यावर आपल्या विशिष्ट शैली मध्ये प्रकाश टाकला. या संपूर्ण कार्यशाळेचे सूत्र संचलन कु. भैरवी गांडोळे व कु. साक्षी माळोदे यांनी केले व शेवटी आभार प्रदर्शन कु. वैष्णवी ठाकरे हिने केले.














आपल्या शहरातील प्रत्येक बातमी

अध्ययन समाचार

आता रोज रहा अपडेट!

संपादक : जितेंद्र रोडे

शनिवार दि. २७ नोव्हेंबर २०२१

## आदर्श महाविद्यालयामध्ये संविधान दिना निमित्त मतदान जनजागृती कार्यशाळा संपन्न

धा.रेल्वे दि. २७ | प्रज्योत पहाडे





स्थानिक धामणगाव एज्यूकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श महाविद्यालय येथे संविधान दिवस व मतदान जनजागृती मोहीम २०२१ यांचा सुवर्ण योग साधून राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभाग द्वारे आयोजित संविधान दिवस व मतदान जनजागृती कार्यशाळा दि. २६ नोव्हेंबर रोजी संपन्न झाली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय.बी. गांडोळे यांनी व प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून धामणगाव तहसील येथील नायब तहसीलदार जगदीश मंडपे यांनी भूषविले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय संविधानाची उद्देशिकेचे वाचन डॉ. पूनम गहुकर महिला रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी व सर्व उपस्थितांनी केले. या दरम्यान राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अमोल बंड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मुख्य अतिथी चा परिचय देऊन आपल्या विशिष्ट भाषण शैली ने संविधानाची रचना, महत्व आणि सामान्य नागरिकांचे मूलभूत कर्तव्य काय आहे यावर प्रकाश टाकला.

नंतर कार्यशाळेची संपूर्ण धुरा प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून आलेले जगदीश मंडपे यांनी सांभाळली आणि भारतीय लोकशाहीमध्ये मतदान प्रक्रियेचे काय महत्व आहे. ते सर्व उपस्थितांना पटून दिले. सभागृहामध्ये उपस्थित नवीन मतदान विद्यार्थी यांना मतदानाचा हक्क व मतदाराचे मुख्य कर्तव्ये या बद्दल सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय.बी. गांडोळे यांनी केले व भारताचे संविधान आणि मतदान प्रक्रिया वाचे महत्व सांगून सर्व उपस्थितांचे मार्गदर्शन केले. कु. वैष्णवी ठाकरे बी.कॉम भाग ३ व दीपक पचारे बी.कॉम भाग ३ या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना अकोला द्वारे आयोजित विद्यापीठ स्तरीय जलसंधारण प्रतिकृती स्पर्धे मध्ये आदर्श महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले या बद्दल त्यांचा प्रमुख अतिथीच्या हस्ते विशेष सत्कार घेण्यात आला.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी व नवीन मतदान विद्यार्थी यांनी उपस्थिति दर्शविली. या संपूर्ण कार्यशाळेचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजने च्या स्वयंसेविका कु. भैरवी गांडोळे व कु. साक्षी माळोदे यांनी केले व आभार प्रदर्शन कु. कल्याणी ठाकरे हिने केले. या संपूर्ण कार्यशाळेच्या यशस्विते करिता राष्ट्रीय सेवा योजनेच्या सुवर्ण वंजारी, साक्षी गोडबोले, ऋषभ ठाकरे, पूनम कुरटकर, चंचल खोत, सिमरन तुळसकर, यश सोटे, लाभांषु, प्रज्वल आरेकर, संस्कृती माळोदे, साक्षी गोडबोले, अंकिता तायडे, रेणुका वानखेडे, अर्पिता शर्मा, अथर्व गावंडे अशा अनेक स्वयंसेवकांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे अथक परिश्रम घेतले.




**१५. मतदार जन जागृती वेबिणार**

दिनांक १०.०२.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने Vote: A National Duty या विषयावर गुगल मिट या आभासी पद्धतीचा वापर करून वेबिणार आयोजित करण्यात आला होता. या वेबिणार ला प्रमुख वक्ते म्हणून डॉ. अरुण मुकुंदराव शेळके, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला येथून उपस्थित होते. या वेबिणार ला महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. या वेबिणार दरम्यान डॉ. अरुण मुकुंदराव शेळके यांनी विद्यार्थ्यांना भारतीय लोकशाही मध्ये मतदानाचे अमूल्य योगदान बद्दल अतुलनीय मार्गदर्शन केले.

या आभासी वेबिणार ला डॉ. अरुण मुकुंद राव शेळके यांना ऐकण्यासाठी हितगुज करण्यासाठी आदर्श महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व राष्ट्रीय छात्र सेना चे विद्यार्थी व इतर विभागाचे विद्यार्थी आवर्जून उपस्थित होते. राष्ट्रीय छात्र सेनेचे अधिकारी श्री अमोल बंड सर यांनी या कार्यक्रमाच्या यशस्विते करिता मोलाचे सहकार्य केले.




सदर वेबिणार ची लिंक पुढील प्रमाणे आहे: https://meet.google.com/zbv-pvzk-yqi

### १६. राष्ट्रीय एकता दिवस

दिनांक १९.११.२०२१ रोजी आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे येथे आभासी पद्धतीने राष्ट्रीय एकता दिवस मनवण्यात आला. सरदार वल्लभ भाई पटेल यांच्या स्मृती प्रीत्यर्थ सर्व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकात्मतेची गरज समजून सांगण्यात आली. सोबतच आभासी पद्धतीने राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या संपूर्ण विद्यार्थ्यांना स्वत:च्या What's App ग्रुप वर लिंक पाठवण्यात आली. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या आभासी शपथ पद्धतीने सहभाग नोंदविला. मिळालेले प्रमाण पत्र ग्रुप वर शेअर केले.

### १७. संत गाडगे बाबा पुण्यतिथी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती द्वारा संचालित आदर्श महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना तर्फे दिनांक २०.१२.२०२१ रोजी संत गाडगे बाबा पुण्यतिथी कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करून संत गाडगे बाबा यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाला, महाविद्यालयाचे I.Q.A.C. विभागाचे समन्वयक डॉ. आनंद नरांजे, माजी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे, महिला रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर, इंग्रजी विभागाचे प्रा. जितेंद्रसिंग बारूळकर, व इतर प्राध्यापक वृंद उपस्थित होते. या कार्यक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांना स्वच्छता विषयी जनजागृती करून स्वच्छता मोहीम राबवण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रम संपन्न झाल्यावर रा. से. यो. स्वयंसेवकांनी आपापल्या गावामध्ये गाडगे महाराजाच्या वेषभूषेमध्ये सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवली.



## १८. प्लास्टिक निर्मूलन (Single Use Plastic Eradication)

धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आदर्श महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना चमूने प्लास्टिक निर्मूलन अभियाना मधे आपला उत्स्फूर्त सहभाग दर्शवला व अनेक छोट्या मोठ्या उपक्रमातून आपली सक्रियता आणि पर्यावरण बद्दल असलेली भावना स्वयंसेवकानी दर्शविली यामधे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी सहायक कार्यक्रम अधिकारी व महिला कार्यक्रम अधिकारी यांच्या सूचनेनुसार व मार्गदर्शन नुसार जे विद्यार्थी ज्या ठिकाणी निवास, करतात राहतात अश्या ठिकाणी आधी स्वच्छता करने, प्लास्टिक कचरा ची योग्य ती विल्हेवाट लावणे व जमा झालेले प्लास्टिक त्याचा योग्य विनियोग होईल असा विचार करण्यात आला व त्यापासून eco bricks ची संकल्पना रा से यो कार्यक्रम अधिकारी यानी मांडली आणि त्याचा परिणाम किंवा प्रतिसाद म्हणून जवळपास 8 गावामधे प्लास्टिक निर्मूलन अभियान यशस्वी रित्या राबवल्या गेले. ज्यामधे 55 रा से यो स्वयंसेवकानी आपले योगदान दिले. करिता वेगवेगळ्या भागात उपक्रम राबवताना google लोकेशन द्वारे फोटो घेण्यात आले .आणि जमा झालेल्या प्लास्टिक ला बॉटल्स मधे भरून eco bricks बनविण्यात आले. आणि त्याचा वापर महाविद्यालयाच्या परिसरात सौंदरीकरण करण्या साठी होतो आहे त्याच्यावर काम सुरू आहे.



आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे

राष्ट्रीय सेवा योजना

# प्लास्टिक निर्मुलन अभियान 2021-22










**सरकारी आदेशानुसार आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत प्लास्टिक निर्मुलन अभ्हीयान राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक कु. अर्पिता शर्मा, कु. सिमरन तुळसकर यांनी अभियानाला सुरुवात केली आहे त्यांनी त्यांच्या परिसरातील देवराई मधील संपूर्ण प्लास्टिक गोळा केले आहे.**













## १९. शिव जयंती २०२२

दिनांक २२.०२.२०२२ रोजी आदर्श महाविद्यालय धामणगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना चमू च्या वतीने शिव जयंती महोत्सव २०२२ साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे हे लाभले व प्रमुख अतिथी म्हणून आदर्श महाविद्यालयाचे वाणिज्य विभागाचे सहाय्यक प्राध्यापक, रा.से.यो. सल्लागार मंडळ सदस्य, व रा से यो माजी कार्यक्रम अधिकारी डॉ. नरेंद्र नागपुरे उपस्थित होते. कार्यक्रमा दरम्यान रा से यो स्वयंसेवकांनी आपले सादरीकरण केले. शिव जयंती निमित्त शुभांषु जाधव या विद्यार्थ्याने छत्रपती शिवाजी महाराज यांची वेश भूषा परिधान केली होती सोबतच आई जिजाऊ च्या भूमिकेत कु. चंचल खोत, सई बाई च्या भूमिकेत कु. सिमरन तुळसकर व मावळे कार्तिक पातालबंसी, लाभांषु जाधव हे होते. या दरम्यान कु. प्रिया हिवरकर हिने "मी जिजाऊ बोलतेय " हा आत्मवृत्त एकपात्री प्रयोग सादर केला. तिचा अंगावर शहारे आणणारा प्रयोग बघून उपस्थितांनी तिचे कौतुक केले. कु. उन्नती मेश्राम हिने शिवबाचे वर्णन अतिशय परखड शब्दात मांडून आजच्या तरुण वर्गाला व्यसन मुक्त होऊन, शिवबाचे नाव घेण्याची तयारी नव युवकाची असायला पाहिजे असे आवाहन केले. कु. साक्षी कोरडे हिने शिवाजीचा प्रताप आपल्या भाषणातून प्रकट केला. अध्यक्षीय भाषणामध्ये आदरणीय प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे यांनी सांगीतले कि "जेव्हा जेव्हा समाजाचं शोषण होते तेव्हा -तेव्हा त्यांचा रक्षणार्थ महान शूर वीरांचा जन्म होत असतो." अशा प्रकारे विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख अतिथी माजी रा से यो कार्यक्रम अधिकारी व वाणिज्य विभागाचे सहा. प्रा. डॉ. नरेंद्र नागपुरे सर यांनी आजच्या समाजाला दिशा दाखविण्यासाठी शिवाजी महाराजांचे विचार केवळ जयंती व घोषणाबाजी करून नव्हे, तर शिवाजी महाराजांचे खरे समाजोपयोगी मावळे बना, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. साक्षी गोडबोले आणि कु. संस्कृती मंडाले हिने केले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन रा से यो चे प्रमुख कार्यक्रम अधिकारी प्रा. श्रीकांत पाटील, सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण केचे व महिला सहा. कार्यक्रम अधिकारी डॉ. पूनम गहुकर यांनी केले. महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यांची कार्यक्रमाला आवर्जून उपस्थिति लाभली. रा. से. यो. सर्व स्वयंसेवकांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु. सुवर्णा वंजारी हिने केले.

| अनु क्र | वेळ (दुपारी) | कार्यक्रम | प्रस्तुति |
|---|---|---|---|
| कार्यक्रमाचे सूत्र संचलन: संस्कृती मांडळे व साक्षी गोडबोले | | | |
| १ | १२.०० | अतिथींचे आगमन व स्थान ग्रहण | -- |
| २ | १२.०५ | छत्रपती शिवाजी, मा जिजाऊ, सई बाई चे आगमन | संस्कृती मांडळे व साक्षी गोडबोले |
| ३ | १२.१० | दीप प्रज्वलन व माल्यार्पण | -- |
| ४ | १२.१५ | अतिथींचे स्वागत | -- |
| ५ | १२. २० | पाहुण्यांचा परिचय व कार्यक्रमाचे प्रास्ताविक | आकांक्षा महल्ले |
| (संत गाडगे बाबा दशसूत्री वाचन) | | | |
| ६ | १२.२५ | कराटे चमू मधील विजेते (रा. से .यो. स्वयंसेवक) | प्रा. श्रीकांत पाटील |
| ७ | १२.३५ | पोवाडा | श्रावणी कदम |
| ८ | १२.४५ | "मी जिजाऊ बोलतेय" – एक आत्मवृत्त | प्रिया हिवरकर |
| ९ | १२.५५ | भाषण | चेतना उखाडे |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ०१.०५ | भाषण | सिमरन तुळसकर |
| ११ | ०१.१० | भाषण | उन्नती मेश्राम |
| १२ | ०१.२० | भाषण | साक्षी कोरडे |
| १३ | ०१.३५ | प्रमुख अतिथी चे मार्गदर्शन | डॉ. नरेंद्र नागपुरे |
| १४ | ०१.५० | अध्यक्षीय भाषण | प्राचार्य डॉ. वाय. बी. गांडोळे |
| १५ | ०१.५५ | आभार प्रदर्शन | सुवर्णा वंजारी |
| १६ | ०२.०० | राष्ट्रगीत | सर्व जन उपस्थित |














## २०. पक्षी पाणपोई व चारा स्टेशन

उन्हाळ्याच्या दिवसात जशे मानवाला खूप त्रास होतो तसा इतर सजीवांना पण होतो. या मध्ये कडक उन्हाळ्याची दाहकता कमी करायची असेल तर भरपूर पाणी पिणे हा एकमेव पर्याय आहे. या संदर्भात एक माणुसकीचे व भूतदयेचे कार्य म्हणून रा. से यो. चमू आदर्श महाविद्यालय, येथील स्वयंसेवकांनी महाविद्यालयाच्या परिसरामध्ये टाकाऊ तेलाचे पिपे आणून त्यापासून सुंदर अशे "पक्षी पाणपोई व चारा स्टेशन" बनवले. याचा वापर पक्ष्यांना चारा व पाणी दोन्ही महत्त्वाच्या गोष्टी एकाच जागी मिळतील. महाविद्यालयाच्या संपूर्ण परिसरामध्ये दर्शनीय ठिकाणी अशा प्रकारचे २० चार स्टेशन व पाणपोई बनून एक अनोखे भूतदयेचे उदाहरण सर्वांसमोर उपस्थित केले. हा संपूर्ण उपक्रम राबवल्या नंतर महाविद्यालयाच्या संपूर्ण विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना भावनिक आवाहन करण्यात आले कि आपण सर्वांनी मिळून या पक्षी पाणपोई व चारा स्टेशन ची जबाबदारी घेऊया व येता जाता या मध्ये पाण्याची उपलब्धता कशी टिकून राहील याची शक्य तशी तडजोड करूया.



## राष्ट्रीय सेवा योजना २०२१-२२ या सत्रा साठी आलेल्या मान्यवरांचे **अभिप्राय**



Date - 12/01/2022

Happy Youth Day to all.


Respected faculty,

we are glad to inform you we are X-student of our Collage (Batch 2004). We continuously came in collage from last 4-Year for Blood donation and we always remember about youth day because of this blood donation camp.

Thanks and Regards

Your Student

① Prashant B. Wani — UCO BANK (Assit Manager) — 9860594047
② Sunish S. Bhusari — AFPRO (CPU Manager) — 9890911944
③ Bhushan D. Kandalkar — Business (Stone Crusher) Mahalaxmi Stone Crusher Dhamangaon Rly — 9860240875
④ Nilesh H. Dhamande — Business (Electric Contractor) — 9730779914



* Blood Donation *

Camp Adarsh Mahavidyalaya Dhamangaon (Rly)


12/01/2022

[illegible]

12.01.2022

आज आदर्श महाविद्यालय, धामणगांव (रेल्वे) येथे रक्तदान शिबीर चा 25 वा वर्षे रौप्य महोत्सव साजरा करीता, मागील अनेक वर्षा पासून स्वामी विवेकानंद जी यांच्या जयंती दिनानिमित्त "युवक दिन" म्हणून रक्तदानाचा महाशिबिर आयोजित [illegible] पद्धतीने आदर्श महाविद्यालय ची संपूर्ण टिम करते. [illegible] आपल्या सर्व महाविद्यालय [illegible] आदर्श महाविद्यालय व डॉ. [illegible] डॉ. [illegible] सर, डॉ. पाटील सर [illegible] आभारी आहे. आपल्या हे [illegible] कायम राहो अशी कामना करतो.

(डॉ. सुनील [illegible])
9730888359.




आपल्या महाविद्यालयाला राष्ट्रीय सेवा योजना (NSS) कार्यालय व इतर सर्व बाबींचा आढावा घेण्यात आला आहे. अत्यंत चांगल्या सुविधा व कार्यक्रम आढावा सुद्धा चांगला आहे. मी आणि डॉ. संजय [illegible] क्षेत्रीय समन्वय यांच्या सोबत पाहणी केली असता सर्व व्यवस्थीत आहे करिता आपल्या पथका कडून गांडूळ खत निर्मिती, पाणी संचय प्रकल्प, घनकचरा निर्मिती आपण आपल्या महाविद्यालयात परिसरामध्ये करावे. आपल्या राष्ट्रीय पथकाला शुभेच्छा व अभिनंदन करतो.

धन्यवाद

दि. ०१.०२.२०२१

आपला
डॉ. राजेश बुरंगे
संचालक राष्ट्रीय सेवा योजना
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ (अमरावती)

डॉ. संजय [illegible]
(क्षेत्रीय समन्वयक)
सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ अमरावती.



Firstly I have to say Congratulation to all NSS & Adarsha College team for good organisation of camp and saying 'Happy Youth Day'

We will in future like to participate in all organisation organised by college after all we all from this college X-students

Thanks for all supports


Lots of words in mind for our memories but lastly we like to say Thanks only

Thanks a lot.

Thanking & Regards


From माजी विद्यार्थी 2004 Batch AMV

Prashant B Wani
Bhushan D. Kandalkar
Sunish S. Bhusari




Very well organised programme on Youth day by Dr. Gendole & his team. May all youth get inspiration from him. Homage to Vivekanandji.

[illegible]




Very well organised programme on Youth day by Dr. Gendole & his team. May all youth get inspiration from him. Homage to Vivekanandji.




राष्ट्रीय युवक दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!
कोवीड-१९ च्या काळात आज देशाला रक्तदानाची
विशेष गरज आहे. आपल्या महाविद्यालयात दरवर्षी
युवक दिनाच्या दिवशी आपण रक्तदान शिबिर
आयोजन करतात ते अभिनंदनीय आहे.

ॲड. आशिष राठी




डॉ. अशोक




अभिनंदन फारच सुंदर आयोजन नेहमी प्रमाणे
या करोना काळात आदर्श महाविद्यालयातील
प्राचार्य प्राध्यापक गणांनी आयोजित केले
ईश्वर चरणी प्रार्थना कि हा उपक्रम सतत
सुरू राहो अभिनंदन
व धन्यवाद।

आपला
अंकुश रूपरावजी ठाकरे




Congratulations to Adarsh College team work on National youth Day. Really feeling obliged to be a part of this blood donation Camp. Best wishes for the future.

(S.P. NAKHATE)
12/01/2021.



आज दि. 26 नोव्हेंबर 2021 रोजी आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे येथे संविधान दिवस तसेच मतदान जनजागृती कार्यक्रमाकरिता ...

Date: 26/11/2021



It's Really nice to be here to Interact with all Students and all Student



राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या रा. से. यो. सल्लागार मंडळ, कार्यक्रम अधिकारी टिम, रा. से. यो. स्वयंसेवक व महाविद्यालयीन संपूर्ण शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक प्रयत्न केले व एकमेकांच्या सहायाने वर्ष भर समाज उपयोगी कार्यक्रम राबवून सामाजिक प्रबोधनासाठी कार्य केले केले. आदर्श महाविद्यालयाचा समाज उपयोगी दृष्टीकोन जपण्याचे कार्य संत गाडगे महाराजाच्या दश सूत्री नुसार निरंतर करत राहतील ही अपेक्षा. रा. से. यो. च्या भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा......!

**प्राचार्य, डॉ. वाय. बी. गांडोळे**



कार्यक्रम अधिकारी
श्रीकांत पाटील



सहा. कार्यक्रम अधिकारी
डॉ. प्रवीण केचे



महिला कार्यक्रम अधिकारी
डॉ. पूनम गहूकर

**रा. से. यो. अधिकारी टिम आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे**

